जावक क्र. ०५४२ /२०२३
विमानतळ पोलीस ठाणे, पुणे शहर.
दि.१९/०९/२०२३

**प्रति,**

मा. जनसंपर्क अधिकारी सो.,
पुणे शहर.

**प्रतिवेदक-** सहा. पोलीस निरीक्षक **सचिन धामणे**, विमानतळ पोलीस ठाणे, पुणे शहर.
**विषय-** अनोळखी मयत पुरुष इसमाचे नातेवाईकांचा व मुळ गावाचा तपास होणेकामी स्थानिक वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी मिळणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सविनय सादर करतो की, विमानतळ पोलीस ठाणे, पुणे शहर अकस्मात मयत क्र. १००/२०२३ कलम १७४ फौ.प्र.सं.-१९७३ अन्वये दि.०७/०९/२०२३ रोजी अन्वये दाखल आहे.

नमुद अकस्मात मयताची हकीकत अशी की, दि.०६/०९/२०२३ रोजी २०:०० वा. च्या सुमारास आर के हॉटेलसमोर, आर के चौक, कलवड वस्ती, लोहगाव, पुणे याठिकाणी एक अनोळखी इसम, वय अंदाजे ६० वर्षे हे अस्वस्थ मिळुन आल्याने त्यांना उपचाराकामी ससुन जनरल हॉस्पीटल, पुणे याठिकाणी रात्री २१:०० वा. दाखल केले. सदर अनोळखी इसमावर उपचार चालु असताना, दि.०६/०९/२०२३ रोजी २१:३० वा. वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना मयत घोषीत केले. सदर अनोळखी मयत इसमाचे मयत बॉडी ससुन डेड हाऊसमध्ये घेऊन जाऊन तेथे सदर अनोळखी मयत इसमाचे बॉडीचे **MLPM NO- 5344/2023** अन्वये पोस्टमार्टेम केले असता, डॉक्टरांनी मयत इसमाचे मरणाचे कारण **Liver Parenchymal disease.** असे नमुद केले आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी यांनी अनोळखी मयत इसमाचे शवविच्छेदना दरम्यान स्टरनम बोन फॉर डीएनए अनालिसीस साठी ताब्यात दिलेला आहे.



**सदर अनोळखी मयत पुरुष इसमाचे वर्णन खालीलप्रमाणे-**

एक अनोळखी मयत पुरुष इसम, अंदाजे वय ६० वर्ष, नाव पत्ता माहित नाही, अंगाने सडपातळ, रंग- काळा सावळा, डोकीचे केस पातळ बारीक काळे पांढरे, दाढी मिशा- बारीक वाढलेली पांढरी, चेहरा उभट, नाक सरळ, उंची ०५ फुट ०५ इंच व इतर मौल्यवान चिजवस्तु मिळुन आली नाही.

तरी अनोळखी मयत पुरुष इसम, अंदाजे वय ६० वर्षे, नाव पत्ता माहित नाही याचे नातेवाईकांचा व मुळ गावाचा तपास होणेकामी स्थानिक वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी मिळावी अशी आपणास विनंती आहे.

(सचिन धामणे)
सहा. पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस ठाणे, पुणे शहर.

**मार्फतीने सविनय सादर-**

(संगीता एस. माळी)
पोलीस निरीक्षक (गुन्हे)